## न्यायदंडाधीकारी प्रथम वर्ग, पैठण यांचे न्यायालयात
## (एस.व्ही.मेटील–पाटील यांचे समक्ष)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | खटल्याचा अनुक्रमांक | – | एस. सी. सी. क्र. ५४१/२०२६ |
| २. | गुन्हा घडल्याचा व फिर्याद दिनांक | – | २४/०३/२०२६ |
| ३. | आरोपीचे नांव | – | ज्ञानेश्वर रावसाहेब इंदापूरे<br>वय -- ३८, धंदा –<br>रा. रांजणगाव खुरी, ता.पैठण,<br>जि. छ.संभाजीनगर. |

४. गुन्ह्याचा तपशिल थोडक्यात असा की,

हे की, तुम्ही दि.२४/०३/२०२६ रोजी १७.४५ वाजेच्या सुमारास मौजे रांजणगाव खुरी, ता. पैठण येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेजवळ दत्तकृपा किराणा दुकानात तंबाखुजन्य पदार्थाची विक्री करण्याची मनाई असतांना सुध्दा तंबाखुजन्य पदार्थ जवळ बाळगतांना व उत्पादनाची विक्री करत असतांना मिळून आले. त्यामुळे तुम्ही सिगारेट व तंबाखु उत्पादने जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व्यवहार आणि पुरवठा व वितरण अधिनियम २००३ चे **कलम ६(ब) दंडनिय कलम २४** प्रमाणे गुन्हा केला आहे.

### ५. आरोपीचे निवेदन

| | | |
|---|---|---|
| प्रश्न क्र. १ | – | तुम्हाला आरोप पत्राचे कागदपत्रे मिळाले काय ? |
| उत्तर | – | होय. |
| प्रश्न क्र. २ | – | तुमचेवर ठेवण्यात आलेले आरोप समजले आहे काय ? |
| उत्तर | – | होय. |
| प्रश्न क्र. ३ | – | तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ? |
| उत्तर | – | होय. मला स्वतःहुन गुन्हा कबूल आहे. |

--------------

(आरोपीची सही /अंगठा)

दि. ३०/०६/२०२६

समक्ष

30.6.26

(एस.व्ही.मेटील–पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र.०१, पैठण

## कारणमिमांसा

प्रस्तुत प्रकरण वरील पोलीसांनी दाखल केले आहे. आरोपीला पोलीसांनी हजर कलेले असून आरोपीने वरीलप्रमपणे स्वेच्छेने व कोणत्याही दडपणाखाली न येता गुन्हा कबूल करत असल्याचे न्यायालयासमक्ष मान्य केले. येणेप्रमाणे आरोपीने इच्छापूर्वक गुन्हा कबूल केला, याची खात्री झाली. आरोपीस शिक्षेच्या मुद्यावर ऐकले असता त्याने द्या दाखवावी व कमीत कमी शिक्षा करण्यात यावी अशी विनंती केली आहे. गुन्ह्याचे स्वरुप बघता व आरोपीचे कथन ऐकता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | आरोपीस सिगारेट व तंबाखु उत्पादने जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व्यवहार आणि पुरवठा व वितरण अधिनियम २००३ चे **कलम ६(ब) दंडनिय कलम २४** प्रमाणे भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७५ (फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५२) नुसार दोषी ठरवून त्यास रुपये २००/- द्रव्यदंड ठोठावण्यात येतो, दंडाची रक्कम न भरल्यास १ दिवसांची साधी कैदेची शिक्षा भोगावी. |
| २ | या प्रकरणातील जप्त मुद्देमाल सरकार जमा करण्यात यावा व संबंधित पोलीस स्टेशनने मुद्देमालाची त्या कायद्याप्रमाणे विल्हेवाट लावावी. |
| | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषीत करण्यात आला. |

(एस.व्ही.मेटील-पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र.०१, पैठण

दि. ३०/०६/२०२६

Penalty RS — 200/-
Recived Vide R... 0379819
Date 30/6/26
30/6/26
Assistant Superintendent
A/C